# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – ४११ ०१८,
## अग्निशामक विभाग,

मानधन तत्वावर ६ महिने मुदतीसाठी करार पध्दतीने **वाहनचालक** नेमणूक करणेबाबत.

जाहीरात क्रमांक ३८२/२०१८ दि. १ /१२ /२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी अग्निशामक विभागाकरीता वाहनचालक करारपध्दतीने / एकवट मानधन तत्वावर आवश्यकता आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| तपशील | अनु.जाती | अनु.जमाती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा प्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | ४८% | १००% |
| वाहनचालक | ०१ | ०१ | ०१ | | | | -- | ०१ | ०४ | ०८ |

**<u>वाहनचालक पदाची - शैक्षणिक अर्हता</u>**:-

१) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ०६ महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन पाठ्यक्रम अथवा किमान तेवढ्याच कालावधीचा शासन मान्य संस्था/ शासन मान्य तत्सम कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) जडवाहन चालविण्याचा वैध परवाना आवश्यक आहे.

४) जड वाहनचालक पदाच्या कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

५) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.

वय – शासकीय नियमाप्रमाणे लागु राहील.

**अटी व शर्ती :-**

१) करारपध्दतीने नेमलेल्या फायरमन नेमणुक ही फक्त ६ महिने मुदतीची असेल. त्यामूळे अर्जदारास कायम स्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही अथवा या संदर्भात मे. न्यायालयात दाद मागता येणार नाही. याबाबतचे र.रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर हमीपत्र रुजू होते वेळी सादर करावे लागेल.

२) **उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता विषयक प्रमाणपत्र, जातीचा दाखला, अनुभव, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसांक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**

३) ज्या दिवशी अग्निशामक विभांगास सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय, सदर उमेदवारांची सेवा थेट संपुष्टात आणण्यात येईल. या संबधिचे सर्व अधिकार अग्निशामक विभागाने राखुन ठेवले आहे.

४) पात्र उमेदवारांना नेमणुक देताना पद संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार अग्निशामक विभागांस राहील.

५) **उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात, पदांसाठी अर्ज, मा. मुख्य अग्निशामक अधिकारी, जनरल अरुणकुमार वैद्य मुख्य अग्निशामक केंद्र, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८ या नावाने करावा. सदर अर्ज दिनांक १५/ १२/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत वरील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावेत.**

६) निवड झालेल्या उमेदवारांस फायरमन पदाचा र.रु. १८,०००/- (अक्षरी अठरा हजार फक्त) या एकवट मानधना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही.

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास. त्याची उमेदवारी / निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यासही कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

८) ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे. त्या पदाचे नाव तसेच उमेदवाराने स्वत:चे पुर्ण नांव, पत्ता, प्रवर्ग व संपर्क क्रमांक पाकीटावर ठळक अक्षरात लिहावे, .

९) दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही.

१०) पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास, त्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहीत नमुन्यात नसलेला अर्ज, अपुर्ण, चुकीचे कागदपत्रे जोडलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

११) अर्जदाराने आपले अर्ज महापालिकेने जाहीरातीमध्ये विहीत केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारकराहील.

१२) अपूर्ण माहिती अथवा अटींची पुर्तता न करणा-या उमेदवारांचे अर्ज बाद करुन अपात्र ठरविले जातील.अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील, त्याबाबत कोणतेही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) सदरचे पद हे पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाचे आहे. यापदावर उमेदवारांस मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.

१४) उमेदवार हा शारिरीक किंवा वैद्यकिय दृष्टया अपात्र असलेचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली सेवा संपुष्टात करणेत येईल. तसेच ह्या बाबत मनपाचे कै. यंशवंतराव चव्हाण रुग्णालय, पिंपरी यांचेकडुन तसे फिटनेस बाबत वैद्यकिय प्रमाणपत्र रुजू होताना जोडणे आवश्यक आहे.

१५) अग्निशामक दलामधील शहरातील कोणत्याही अग्निशमन केंद्रामध्ये आवश्यकतेनुसार तीन पाळयांमध्ये अग्निशमन व अन्य सर्व प्रकारच्या ड्युटी करणे आवश्यक राहील.

१६) उमेदवारांना स्वखर्चाने अग्निशामक दलाचा गणवेश शिवून घ्यावा लागेल तसेच सेफ्टी बुट ई. परिधान करावे लागतील. विभागाकडून कोणत्याही प्रकारचा गणवेश ई. साहित्य् उपलब्ध् होणार नाही.

१७) आग, पुर, भुकंप ई. आपत्कालीन परिस्थीतीत जोखमीचे व धाडसाचे काम करावे लागणार असल्याने त्याचा कोणताही अतिरीक्त मोबदला अथवा विमा ई. सुरक्षा उपलब्ध् होणार नाही. सदर जोखमीचे काम, स्वजबाबदारीवर करावयाचे असून त्याबाबतचे हमीपत्र नियुक्तीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. पद भरतीची प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अथवा त्यामध्ये बदल करण्याचा अंतिम निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राहील.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मुख्य अग्निशामक अधिकारी | मा.अतिरीक्त आयुक्त (२) |
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, | पिंपरी चिंचवड महानगरपालिका, |
| पिंपरी – १८ | पिंपरी – १८ |

**अर्जाचा नमुना**

पासपोर्ट साईज
फोटो

**प्रति,**
**मा.मुख्य अग्निशामक अधिकारी,**
**जनरल अरुणकुमार वैदय मुख्य अग्निशमन केंद्र,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८.**

**विषय :- वाहनचालक पदी मानधनावर नेमणुकीबाबत.**

महोदय,

संदर्भीय दिनांक / /२०१८ जाहीरातीनुसार मी (संपुर्ण नांव अडनाव प्रथम) ---------------------------------------------- ---------------------------------------------- " वाहनचालके " या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन, फायरमन या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडीलांचे/पतीचे नाव

१.संपुर्ण नाव ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------
२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------
(पिनकोडसह) ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------
३.दुरध्वनी/मोबाईल क्र. ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------
४.जन्मतारीख दि. / / (अक्षरी---------------------------------------------------------------------------------)
५.लिंग स्त्री / पुरुष
६.जात ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------
७.प्रवर्ग (✓ अशी खुण करा) - अनु.जाती. / अनु.जमाती / विजा-अ /भज-ब/ भज-क / भज-ड / विमाप्र / इमाव / खुला
८.अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठ/ संस्थंचे नांव | उर्तीण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी व अन्य | | | | |
| २ | फायरमन पाठ्यक्रम | | | | |

९. जड वाहन परवाना :क्र. .................................... कालावधी दिनांक .................................

१०.अनुभव असल्यास : कंपनीचे नांव : -------------------------------------------------------------
पदनांम : -----------------------------------------------------------
कालावधी : -----------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असुन, त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन् आल्यास तया माहितीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही व नाव

सहपत्रे : १)